ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक 422 222

दूरध्वनी -(०२५३)२२३१७१४-१५,२२३०२२७,२२३०४५९,२२३००२४-२५,२२३००२७-२८

फॅक्स : (९१) २५३-२३१७१६ *Visit us on Internet http://www.ycmou.com*

जावक क्र. : 

दिनांक : 23/05/2019

प्रति,

________________________

________________________

**विषय : मुंबई विभाग अभ्यासकेंद्र यादी आणि उपलब्ध शिक्षणक्रम संक्षिप्त माहितीपुस्तिका यांचे- छपाईचे दर मिळणेबाबत ...**

महोदय,

विद्यापीठास मुंबई विभाग अभ्यासकेंद्र यादी आणि उपलब्ध शिक्षणक्रम संक्षिप्त माहितीपुस्तिकांची छपाई करावयाची आहे. या छपाईचे तपशील पुढीलप्रमाणे आहेत.

**(1) मुंबई विभाग अभ्यासकेंद्र यादी**

आकार - डेमी 1/4 पृष्ठे - 32 प्रती - 2000 प्रती बांधणी- सेंटर पिनिंग

**(2) उपलब्ध शिक्षणक्रम संक्षिप्त माहितीपुस्तिका**

आकार - डेमी 1/4 पृष्ठे - 8 प्रती - 5000 प्रती बांधणी- सेंटर पिनिंग

वरील दोन्ही पुस्तिकांसाठी

आतील पाने - एकरंगी छपाई

दोन्ही पुस्तिकांसाठी स्वतंत्र मुखपृष्ठ नाही **(सेल्फ कव्हर आहे)**.

कागद - आतील पाने - 58 / 68 जीएसएम मॅपलिथो **(विद्यापीठ साठ्यातून दिला जाईल)**

तरी वरील तपशिलांनुसार छपाईकरीता येणाऱ्या खर्चाचे दरपत्रक 'वित्त अधिकारी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक 422 222' यांच्या नावाने सीलबंद पाकीटात दि. **27/05/2019** पूर्वी ग्रंथनिर्मिती केंद्राकडे पाठवावे. पाकीटावर **'दोन प्रकारच्या माहितीपुस्तिका - छपाई दरपत्रक'** असा मजकूर नमूद करावा. प्रत्येक पुस्तिकेसाठीचा दर स्वतंत्र द्यावा.

**कामाच्या अटी व शर्ती**

(1) छपाईस देतेवेळी पृष्ठसंख्येत फरक झाल्यास मान्य दरांनुसार अंतिम पृष्ठसंख्येचा दर देण्यात येईल.

(2) छपाई कामाची अंतिम सॉफ्ट कॉपी विद्यापीठाकडून देण्यात येईल.

(3) आतील पृष्ठांच्या छपाईसाठीचा आवश्यक कागद विद्यापीठाद्वारे देण्यात येईल.

(4) आवश्यक कागद विद्यापीठ भांडारातून मुद्रकाने घेऊन जाणे अनिवार्य आहे.

(5) छपाई दरांव्यतिरिक्त जीएसटी कराच्या टक्केवारीचा उल्लेख स्वतंत्र करणे आवश्यक आहे.

(6) छपाई व बांधणी करून प्रतींचे गठ्ठे व्यवस्थित बांधून विद्यापीठाच्या भांडार कक्षात पोहोचते करणे आवश्यक आहे. सदर कामाची तातडी लक्षात घेता दि. 31 मे 2019 रोजी किंवा तत्पुर्वी काम पोहोचते करणे आवश्यक आहे.

(7) व्यवहाराच्या अन्य अटी व शर्ती विद्यापीठ नियमानुसार लागू राहतील.

23/05/19

निर्मिती अधिकारी

ग्रंथनिर्मिती केंद्र

Admn\letter\letter 2018-19